नि.दरखास्त क्र. ०३/२००५
मोरेश्वर गणपत देशमुख
वि.
दत्तात्रय हनुमंत देशमुख व इतर

## नि. १६२ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज हा दरखास्तदार यांनी पोलीस संरक्षणात कब्जा वॉरंटची बजावणी व्हावी याकरिता दाखल केलेला आहे. त्यांच्या कथनानुसार कब्जा वॉरंटच्या अहवालानुसार ऋणको व त्यांचे कुटंबियानी कब्जा बजावणवेळी आरडाओरडा करुन शांततेचा भंग करुन बजावणीस हरकत व अडथळा केलेला आहे. सदरची बाब नि.१६१ कडील बेलिफ अहवालात आहे. ऋणको व त्यांचे कुटुंबिय हे जाणुनबुजून हेतूपुरस्करपणे वेगवेगळी कारणे सांगून अडथळा करित असल्याने पोलीस संरक्षणात कब्जा वॉरंटची अमंलबजावणी होवून मिळावी व ऋणको यांना दि.प्र.संहिता आदेश २१ नियम ३८ प्रमाणे दिवाणी तुरूंगात ठेवण्याची मागणी दरखास्तदार यांनी केली आहे.

२. नि.१७१ कडे ऋणको यांनी त्यांचे म्हणणे सादर करुन दरखास्तदार यांचा अर्ज नाकारलेला आहे. ऋणको यांच्या नि.१७१ च्या म्हणणेतील सर्व कथने ही अडथळादार यांनी नि.१७६च्या अर्जात नमुद केली असल्याने व नि.१७६ च्या आदेशामध्ये न्यायालयाने तपशीलवार सर्व तक्रार नमूद केली असल्याने त्यांचा पुर्नोच्चार याठिकाणी करणे आवश्यक वाटत नाही.

३. दरखास्तदार व ऋणको यांना ऐकले. अर्ज व म्हणणेतील कथने वाचली.

४. मूळ दावा क्र. ३८/१९९८ हा अतिक्रमणाबाबत होता. दि.२६/०३/१९९९ ला निकाली झाला. त्यावर ऋणको यांनी अपील दाखल केले नाही. त्यानंतर दरखास्तदार यांनी रे.दं.नं.२/२००० ची दरखास्त दाखल केली. ज्यामध्ये आपसात होवून ऋणको यांनी अतिक्रमण काढून घेतलेची बाब अभिलेखावर आहे. परंतु, पुन्हा अतिक्रमण केले म्हणून

नि.दरखास्त क्र. ०३/२००५
मोरेश्वर गणपत देशमुख
वि.
दत्तात्रय हनुमंत देशमुख व इतर

द.दार यांनी रे.द.नं.३/२००५ ची दरखास्त दाखल केली. यामध्ये <u>नि.१६१</u> कडे ऋणकोचे कुटंबिय म्हणजेच अर्जातील अडथळादार यांनी अतिक्रमण केलेचा अहवाल प्राप्त झाला आहे. सदर अडथळादार यांचा <u>नि.१७६</u> कडील दि. प्र.संहिता आदेश २१ नियम ९७ खालील अर्ज नामंजूर करणेत आलेला आहे. थोडकयात, कब्जा वॉरंट बजावणीवेळी ऋणको यांनी अडथळादार यांचेमार्फत हरकत उप्स्थीत करुन शांतता भंग केलयाचे <u>नि.१६१</u> च्या बेलिफ रिपोर्टवरुन समोर आलेले आहे.

५. जेव्हा कब्जा घेताना वाद होऊन शांतता भंग होण्याची किंवा हिंसाचार होण्याची दाट शक्यता निर्माण होते व हुकूमनामा ज्याच्या विरुद्ध आहे, ती व्यक्ती किंवा इतर तृतीय पक्ष जाणीवपूर्वक शारीरिक अडथळा निर्माण करतात व न्यायालयाचा अधिकारी कोर्ट बेलिफ जेव्हा प्रत्यक्ष जागेवर कब्जा मिळवण्यासाठी जातो आणि त्याला धमकावले जाते किंवा कब्जा देण्यास स्पष्ट नकार दिला जातो त्या परीस्थीतीत पोलीस बळाशिवाय या आदेशाची अंमलबजावणी होणे अशक्य होते तेव्हा दि. प्र. संहितेच्या कलम १५१ अंतर्गत न्यायालयाला असलेल्या 'अंगभूत अधिकारांचा' वापर करून पोलीस मदतीचा आदेश दिला जाऊ शकतो. त्यामुळे प्राप्त परीस्थीतीत दरखास्तदार हे पोलीस संरक्षणाची दाद मागण्यास पात्र आहेत. तथापी, दि.प्र.संहिता आदेश २१ नियम ३७ व ३८ हे रक्कम वसुलीच्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीशी संबंधित आहे. त्यामध्ये प्रामुख्याने पैशाच्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्यासाठी कर्जदाराला अटक आणि दिवाणी तुरुंगात स्थानबद्ध करणे या तरतुदी नमुद आहेत. या केस मधील हुकूमनामा हा रक्कम वसुलीचा नाही. त्यामुळे दरखास्तदार यांनी मागितलेली दिवाणी तुरूगात ठेवण्याची दाद देता येणार नाही. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

नि.दरखास्त क्र.  ०३/२००५
मोरेश्वर गणपत देशमुख
वि.
दत्तात्रय हनुमंत देशमुख व इतर

## अंतिम आदेश

| | |
|---|---|
| १. | दरखास्तदार यांनी नि.१६२ अन्वये केलेली पोलीस संरक्षणाची मागणी मंजूर करण्यात येत आहे व दि.प्र.संहिता आदेश २१ नियम ३७ व ३८प्रमाणे ऋणको यास दिवाणी तुरूगात ठेवण्याबाबत केलेली मागणी अमान्य करण्यात येत आहे. |
| २. | संबंधित पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षकांनी हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना, विशेषतः नि.५७ मधील नकाशाप्रमाणे लाल रेषेतील अतिक्रमण काढताना दरखास्तदार आणि बेलिफ यांना पूर्ण पोलीस संरक्षण पुरवावे. आवश्यक तो पोलीस भत्ता दरखास्तदार यांनी संबधित पो.स्टे.ला जमा करावा. |
| ३. | जर हरकतदारांनी किंवा इतर कोणत्याही व्यक्तीने अंमलबजावणीत अडथळा आणला, तर त्यांना जागेवरून हटवण्यात यावे आणि आवश्यक असल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. |
| ४. | कोर्ट बेलिफ यांनी सदर अंमलबजावणी पूर्ण करून त्याचा अहवाल या न्यायालयात सादर करावा. |

URMILA PARASHRAM KOLI
Digitally signed by URMILA PARASHRAM KOLI
Date: 2026.05.05 18:32:23 +0530

दि. ०५/०५/२०२६

**श्रीमती यु.पी.कोळी**
सह दि. न्या.क.स्तर. शहापूर

**प्रमाणपत्र**

आदेशाची तारीख :- ०५/०५/२०२६
तपासण्याची तारीख :- ०५/०५/२०२६
सही केलेली तारीख :- ०५/०५/२०२६
अपलोड केल्याची तारीख :- ०५/०५/२०२६

प्रमाणित करण्यात येते की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मुळ शब्द न शब्द न्यायनिर्णयाप्रमाणे / आदेशाप्रमाणे जशास तसा खरा व बरोबर आहे.

न्यायालयाचे नावः- सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, शहापूर

दिनांक- ०५/०५/२०२६

स्थळ - शहापूर

(लघुलेखिका नि.श्रे.)
एस.एस. काकडे